जा.क्र.एबाविसेयोला/आस्था/कावि/24/2025
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,लातूर (ग्रा.)
दिनांक :- 11/02/2025

# अंगणवाडी सेविका व मदतनीस पदभरती जाहीर प्रगटन
## कार्यालय- एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प लातूर (ग्रामीण) ता.लातूर जिल्हा लातूर
## पत्ता – पंचायत समिती तळमजला लातूर

एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लातूर (गामीण) जिल्हा लातूर या प्रकल्प कार्यक्षेत्रांतर्गत खाली नमुद केलेल्या 02अंगणवाडी सेविका व 27अंगणवाडी मदतनीस या मानधनी तत्वावरील पदांसाठी एकत्रित मानधन तत्वावर महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र94/का.6 दिनांक 02.02.2023, शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र94/का.6 दिनांक11.08.2023 व मा आयुक्त एकात्मिक बालविकास सेवा योजना महाराष्ट राज्य नवी मुंबई यांचे दिनांक 31/01/2025 पदे तात्काळ भरणेबाबत आदेश तसेच शासन निर्णय क्रमांक एबावि-2022/प्र.क्र.94/का.6 दिनांक 30.01.2025 मधिल तरतुदी नुसार निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यात पात्र महिला उमेदवाराकडून अर्ज मागविण्यांत येतआहेत.

**अंगणवाडी सेविका रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणेआहे.**

| अक्र | गावाचे नाव | अंगणवाडी केंद्र | भरावयाचे रिक्त पद | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | दगडवाडी | दगडवाडी 1 | अंगणवाडी सेविका | |
| 2 | रमजानपूर | रमजानपूर 1 | अंगणवाडी सेविका | |

**अंगणवाडी मदतनीस रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणेआहे.**

| अक्र | गावाचे नाव | अंगणवाडी केंद्र | भरावयाचे रिक्त पद | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | गंगापूर | गंगापूर 6 | अंगणवाडी मदतनीस | |
| 2 | वासनगाव | वासनगाव 4 | अंगणवाडी मदतनीस | |
| 3 | अंकोली | अंकोली 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 4 | 12 नंबरपाटी (शामनगर) | 12 नंबरपाटी (शामनगर) 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 5 | सिकंदरपूर | सिकंदरपूर3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 6 | साखरा | साखरा 3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 7 | मांजरी | मांजरी 3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 8 | हरंगूळखु | हरंगूळखु 5 | अंगणवाडी मदतनीस | |
| 9 | मुरुडअकोला | मुरुडअकोला 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 10 | हरंगूळ बु | हरंगूळ बु 3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 11 | हरंगूळ बु | हरंगूळ बु 10 | अंगणवाडी मदतनीस | |
| 12 | हरंगूळ बु | हरंगूळ बु 11 | अंगणवाडी मदतनीस | |
| 13 | वरवंटी | वरवंटी तांडा 02 | अंगणवाडी मदतनीस | |
| 14 | चिखलठाणा | चिखलठाणा 1 | अंगणवाडी मदतनीस | |
| 15 | महाराणाप्रतापनगर | महाराणाप्रतापनगर 1 | अंगणवाडी मदतनीस | |
| 16 | महाराणाप्रतापनगर | महाराणाप्रतापनगर 7 (नवीन वस्ती ) | अंगणवाडी मदतनीस | |
| 17 | सोनवती | सोनवती 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 18 | नांदगाव | नांदगाव 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 19 | नांदगाव | नांदगाव 4 | अंगणवाडी मदतनीस | |
| 20 | मळवटी | मळवटी 3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 21 | उमरगा | उमरगापाटी2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 22 | सलगराबु | सलगराबु 3 | अंगणवाडी मदतनीस | |
| 23 | बोकनगाव | बोकनगाव 1 | अंगणवाडी मदतनीस | |
| 24 | कातपूर | कातपूर 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 25 | बाभळगाव | बाभळगाव 5 | अंगणवाडी मदतनीस | |
| 26 | सिरसी | सिरसी 2 | अंगणवाडी मदतनीस | |
| 27 | कव्हा | कव्हा 5 | अंगणवाडी मदतनीस | |

## -: अर्जदारासाठी मार्गदर्शक सुचना नियम व अटी खालीलप्रमाणे :-

1 )**शैक्षणिक पात्रता :-**

अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस पदासाठी इयत्ता १२वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष ) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.तसेच पदवीधर,पदव्युत्तर, डि.एड.,बी.एड.,एम.एस.सी.आय.टी. यापैकी अतिरिक्त शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास त्यानुसार गुण देण्यात येतील.सर्व शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रती जोडणे बंधनकारक राहील.

2 ) **वास्तव्याची अट / स्थानिक रहिवाशीची अट :-**

स्थानिक रहिवाशी असणे, अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदावर फक्त त्या गावातील ग्रामपंचायत नव्हे तर महसुली गाव/वाडी/वस्ती/पाडे या क्षेत्रातील रहिवासी यांना स्थानिक समजण्यात येईल. यासाठी रहिवासी असले बाबत विहीत नमुन्यातील स्वयंघोषणापत्रा सोबत स्थानिक रहिवासाचा पुरावा (मतदार ओळखपत्र/आधारकार्ड/रेशनकार्ड/लाईट बील) जोडणे आवश्यक राहील अथवा सक्षम प्राधिकारी तहसीलदार यांचे राहिवासी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**3 ) वयाची अट :-**

अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदासाठी वयो मर्यादा किमान 18 वर्ष व कमाल 35 वर्ष राहील. तथापि विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्ष राहील. वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी) किंवा बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय हेअर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास गणना करण्यात येईल.

**4 ) लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र :-**

वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारास लहान कुटुंबाची अट लागू राहील, लहान कुटूंब याचा अर्थ उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्य असा राहील. उमेदवारास दोन पेक्षा जास्त हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) नसावीत, अर्जासोबत विहित नमुन्यात लहान कुटुंबाबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवाराला दोन हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल, तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) असून देखील तिसरे अपत्ये झाल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

**5 ) भाषेचे ज्ञान :-**

अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करणा-या अर्जदारास मराठी भाषेची ज्ञान बंधनकारक राहील. याकरीता इयत्ता १०वी अथवा बारावी /पदवी /पदव्युत्तर पदवी /बीएड /डीएड या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हते पैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. ज्या अंगणवाडी मध्ये 50 टक्के पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा.बंजारा, उर्दु, हिंदी, माडीया, गोंड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकु, तेलगु, भिल्लोरी) इ.पैकी एक भाषा बोलणारी असतील तर तेथील सेविका/मदतनीस पदासाठी सदर भाषेचे ज्ञान (लिहिता व वाचता येणे) आवश्यक राहील.

**6 ) उमेदवार विधवा असल्यास :-**

ग्रामपंचायत / नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत किंवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील पतीचे मृत्यु प्रमाणपत्र व स्वयंघोषणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहिल.

**7 )उमेदवार अनाथ असल्यास :-**

शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकारी विभागीय उपआयुक्त, महिला व बालविकास यांचे अनाथ प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

**8 ) मागासवर्गीय/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवार असल्यास :-**

मागासवर्गीय उमेदवार अनुसूचित जाती / अनु. जमाती/ इतरमागास प्रवर्ग / विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक /विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले स्वतःच्या नावाचे जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे बंधनकारक राहिल. **जातप्रमाणपत्र मिळणे करिता तहसिल कार्यालयात अर्जसादर केलेली पावती ग्राहय धरली जाणार नाही.**

**9 )अनुभव :-**

शासकिय यंत्रणेतील अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस म्हणुन किमान दोन वर्षाचा अनुभव असल्यास सक्षम अधिका-याचे म्हणजेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यताप्राप्त खाजगी व स्वंयसेवी, अनुदानित / विना अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही. उमेदवाराने याबाबत कोणताही युक्तीवाद केल्यास मान्य केले जाणार नाही. अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीनंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**10 ) बदली :-**

अंगणवाडी कर्मचारी हे एकाकीपद असल्यामुळे तसेच ती स्थानिक रहिवाशी असावी या केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही.

**11) अर्जदाराचे नावात बदल :-**

अर्जदाराचे नावात बदल असल्यास दोन्हीही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र अथवा पुरावा सादर करावा.

**12 ) अर्जाबाबत :-**

एकाच गावात अंगणवाडी सेविका व मदतनीस अशी दोन्ही पदे भरावयाची असल्यास सदर दोन्ही पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

**13 ) अर्जासोबत जोडावयाचे प्रमाणपत्रांची माहिती :-**

- उमेदवाराने अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा,
- किमान बारावी उत्तीर्ण शैक्षणिक प्रमाणपत्र सोबत जोडावे,
- मागासवर्गीय असल्यास जातीचे प्रमाणपत्र (स्वतःचे नावाचे),
- बारावीनंतर उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास उदा. पदवीधर, पदव्युत्तरपदवी, डी. एड, बी. एड, एमएससीआयटी किंवा समकक्ष व इतर शैक्षणिक कागदपत्रे सोबत जोडावे.
- अनुभव विधवा, अनाथ असल्यास सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

( **टिप** :- गावाचे नांव व पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपूर्ण, अर्जामध्ये खाडा-खोड केलेले, विहित ठिकाणी स्वाक्षरी नसलेले तसेच अर्जासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या सक्षम प्राधिका-यांकडून साक्षांकितकेलेल्या प्रति नसणे इत्यादिकारणामुळे अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील व त्याबाबत उमेदवारास स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. )

**14 ) निवड कार्यपध्दती :-**

शासन निर्णयानूसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता बारावी / पदवी / पदव्युत्तर / डीएड / बीएड / संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेल्या गुणांनुसार तसेच विधवा, अनाथ, अनुभव, जातप्रवर्ग,आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणीक मागास वर्ग इत्यादिसाठी त्यांचे प्रमाणपत्रावरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणांनुक्रमाने पात्र उमेदवारांची गावातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यांत येईल. **टपाल /ईमेलने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता फक्त समक्ष कार्यालयास सादर केलेल्या अर्जांचाच विचार केला जाईल** .

- या पदांकरिता लेखी अथवा मौखिक मुलाखत घेतली जाणार नाही.
- अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्यानुसार उमेदवारांना गुण देवून प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत येईल,
- विहीत मुदतीनंतर प्राप्त तक्रारीची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना निकाला बाबत कळविण्यांत येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांची निवड करण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नेमून दिलेल्या अंगणवाडी केंद्रावरच विहीत मुदतीत हजर व्हावे लागेल.
- उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर रकोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही.
- त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याहीक्षणी उमेदवाराने अर्जात किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अथवा खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर किवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यांत येईल,
- निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीवेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यांत येईल.
- एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.
- अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदावर अंतिम निवड झाल्यास उमेदवारास पंचायत राज संस्था, जि. पं./ पं. स. सदस्य असल्यास या पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

**15 ) मानधन :-**

अंगणवाडी सेविका व मदतनीस हे मानधनी स्वरुपाचे पदे असून या पदाकरीता मानधन इत्यादी बाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रक (ध्येय/धोरणे) लागु राहतील.

**16 ) सेवा समाप्ती व वयाचीअट :-**

दिनांक 02.02.2023 च्या शासन निर्णयानुसार नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांची सेवा वयाची 60 वर्षे पुर्ण होई पर्यंत किंवा त्या शारिरीकदृष्ट्या काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सेवा सुरु ठेवण्यात येईल.

**17 ) कागदपत्र पडताळणी :-**

शासन निर्णया नुसार ज्या उमेदवाराची निवड होईल त्याउमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या मुळप्रतींची उमेदवारास हजर करुन घेण्यापुर्वी पडताळणी / तपासणी केली जाईल. ज्या प्रकरणी कोणत्याही प्रकारची शंका असेल असे प्रकरण संबंधीत सक्षम प्राधिका-यांचे निदर्शनास आणून दिले जाईल. निवड झाल्यानंतर खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास झालेली निवड रद्द करण्यात येईल. तसेच कामावर रुजु करुन घेतले असेल तर कामावरुन कमी करण्यात येईल. जाहिराती मधील कोणत्याही मुददयाबाबत साशंकता किंवा संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

**18 ) पत्रव्यवहार :-**

भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्वसुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना कार्यालयाच्या नोटिसबोर्डवर लावण्यात येतील.

**19 ) अर्जाचा कालावधी :-**

उक्त पदासाठी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह दिनांक **11.02.2025** ते दिनांक **25.02.2025** या कालावधीत सकाळी 10.00 ते सायं. 5.00 या वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारले जातील. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सायं. 6.00 वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. विहित मुदतीनंतर आलेले अर्ज वा कोणत्याही प्रकारचे दस्ताऐवज स्विकारले जाणार नाहीत.

**20 ) महत्वाची सुचना :-**

भरती प्रक्रिया शासननिर्णयातील तरतुदीनूसार अन्वये राबविण्यात येणार असुन निवड व नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करिता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडु नये. **मा आयुक्त एकात्मिक बालविकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे आदेश जा.क्र.एबाविसेयो/अंगणवाडी /का -7/2024-25/517दिनांक 31/01/2025 नूसार पुर्वीच्या निकषांनूसार जाहिरात देवून निवड समितीने अंतिम गुणवत्ता पडताळणी यादी प्रसिध्द केलेली नसल्याने अगोदर सुरु असलेली भरती प्रक्रिया या जाहिर प्रगटनाव्दारे रदद घोषीत करण्यात येत आहे तरी यापुर्वी कार्यालयास प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नसून अर्जदारांनी या जाहीर प्रगटनातील तरतुदीनूसार पुन्हा अर्ज करावे .पुर्वीच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .**

**21 ) अर्ज स्विकृतीचे ठिकाण व पत्ता :-**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प लातूर (ग्रामीण)ता लातूर,जिल्हा लातूर.पत्ता – पंचायत समिती तळ मजला लातूर पिनकोड 413512

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
ए.बा.वि.से.यो.प्र.लातूर ग्रा

**प्रतिलीपी**

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
4. मा जिल्हा माहिती अधिकारी ,जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय लातूर
5. सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय ------------------------- ता लातूर जिल्हा लातूर यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की ,सदरिल जाहिरातीबाबत दवंडीदेवून व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिध्दी देण्यात यावी .
6. संबंधित अंगणवाडी पर्यवेक्षिका विभाग------------------------ ए बावि से यो प्रकल्प लातूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव देवून सुचित करण्यात येते की , आपण सदर गावात स्वत: हजर राहून या जाहिरातीसंबंधी गावात व्यापक प्रसिद्धी देण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही अनुसरुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ प्रकल्प कार्यालयास सादर करावा .

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
ए.बा.वि.से.यो.प्र.लातूर ग्रा